# प्रेस नोट

दिनांक १७/०५/२०१९

**कोपरी पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथील सहा.पो.उप निरीक्षकास लाच स्विकारल्याप्रकरणी शिक्षा**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | कोपरी पो.स्टे. ठाणे शहर गुन्हा नोंद क्रमांक ।। ९१/२०१० |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे (मुख्यालय सीआर/३५९/ठाणे/२०१०) |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **हुसेन दस्तगीर शेख, तत्का.सहा.पोलीस उप निरीक्षक, नेम. कोपरी पोलीस स्टेशन, ठाणे शहर** |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | **५,०००/— रुपये** |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | **३,०००/— रुपये** |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांच्यावर कोपरी पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्हयामध्ये कारवाई न करण्यासाठी नमुद लोकसेवक यांना तक्रारदार यांच्याकडुन ३,०००/— रुपयांची लाच स्विकारताना रंगेहाथ पकडुन, त्यांच्याविरुध्द कोपरी पोलीस स्टेशन येथे दिनांक २८/०९/२०१० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>गुन्हयाचा तपास पुर्ण करुन मा. अतिरिक्त सत्र न्यायालय—१ ठाणे येथे नमुद आरोपी यांचेविरुध्द दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.<br>सदर गुन्हयाची सुनावणी मा. न्यायाधीश श्री. एच. एम. पटवर्धन, अति. सत्र न्यायालय—१ ठाणे येथे झाली असता सुनावणीअंती नमुद आरोपी विरुध्द् सबळ पुराव्यानिशी आरोप सिद्ध झाल्याने दिनांक १७/०५/२०१९ रोजी खालीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.<br>**शिक्षा — भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे**<br>१) कलम ७ प्रमाणे १ वर्ष सक्त मजुरी कारावास व ५,०००/— रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिने साधा कारावास.<br>२) कलम १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे १ वर्ष सक्त मजुरी कारावास व ५,००० रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिने साधा कारावास<br>सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक, श्री. विलास पाटील व दिलीप पाटील,एसीबी, ठाणे यांनी केला असुन, सरकारी अभियोक्ता म्हणुन श्री. संजय लोंढे यांनी काम पाहिले. |

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्‌ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :— **ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**
संकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई—मेल :— spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लिकेशन :— acbmaharashtra.net
टोल फ्री नं :— १०६४
दुरध्वनी क्र. :— ०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्‌ ॲप क्र. :— ९९३०९९७७००

पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

( डॉ. महेश पाटील )
पोलीस अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,
ठाणे परिक्षेत्र, ठाणे

Scanned by CamScanner